सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/


वर्ष १ ले | अंक : १७३ | सोमवार, दि. १६ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे
अभीष्टचिंतन





**श्री. जिजाबराव देवरे**
मुख्याध्यापक



**संजीवनी पाटील**
शिक्षिका, किडझी



**श्री. दिनेश सैनानी**
व्यापारी

## बारामती आणि राहुरीची पोटनिवडणूक बिनविरोध होऊ द्या...!

### मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीसांचे आवाहन अन् इशाराही...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : बारामती आणि राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणूक बिनविरोध झाली पाहिजे. मात्र, आमच्यावर निवडणूक लादली गेली, तर आम्ही लढायला तयार आहोत, असे आवाहन व इशारा मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच विरोधकांना दिला आहे.



अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे आमदार शिवाजी भानुदास कर्डिले यांचे गेल्यावर्षी ऑक्टोबर महिन्यात निधन झाले. तेव्हापासून राहुरी विधानसभेची जागा रिक्त आहे. त्यामुळे, आता या जागेवर पोटनिवडणूक होणार असून निवडणुकीत भाजप राहुरी मतदारसंघातून कोणाला उमेदवारी देणार? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. दुसरीकडे राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभेच्या जागेवरही पोटनिवडणूक होणार आहे. निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रातील दोन विधानसभा पोटनिवडणुकीची घोषणाही झाली आहे. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीसोबतच दोन्ही जागांच्या निवडणुकीची घोषणा झाली आहे.

> बारामती आणि राहुरी या विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान पडणार आहे. दोन्ही ठिकाणची मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे. त्यासोबतच पश्चिम बंगाल, आसाम, तामिळनाडू केरळ आणि पद्दुचेरी या पाच राज्यांच्या निवडणुकीची घोषणा निवडणूक आयोगाने केली आहे.

**बारामती आणि राहुरीत उमेदवार कोण?**


बारामती मतदारसंघासाठी उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार यांचे नाव जवळपास निश्चित झाले आहे. राहुरी मतदारसंघात शिवाजी कर्डिले यांचे सुपुत्र अक्षय कर्डिले यांना उमेदवारी मिळावी अशी आमची इच्छा आहे. मात्र, यासंदर्भात मुख्यमंत्री निर्णय घेतील, अशी प्रतिक्रिया भाजप प्रदेश उपाध्यक्ष सुजय विखे- पाटील यांनी दिली होती. त्यामुळे, येथील उमेदवार कोण? याची चर्चा मतदारसंघात रंगली आहे.

## अमळनेर शहरात स्वतंत्र पोलीस ठाण्याची निर्मिती व्हावी

### आमदार अनिलदादा पाटील यांची विधानसभेत मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेर शहर व तालुक्यात वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर शहरात स्वतंत्र पोलीस ठाण्याची निर्मिती करावी, अशी मागणी आमदार अनिलदादा पाटील यांनी शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी विधानसभेत केली आहे. अमळनेर शहरात चोरी, चेन सॅचिंग तसेच गुंडागिरीच्या



घटनांमध्ये वाढ होत असल्याचेही त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

याबाबत अनिलदादा पाटील यांनी सांगितले, की शहरासह ग्रामीण भागात दिवसाढवळ्या तसेच रात्रीच्या वेळी चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांसह नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्या अमळनेर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात शहर व ग्रामीण दोन्ही भाग येतात. परिणामी पोलिसांच्या कामाचा ताणही वाढत आहे. त्यामुळे शहरासाठी स्वतंत्र नवीन पोलीस ठाणे उभारण्यात यावे. अमळनेर पोलिसांची संख्याही वाढली पाहिजे. शहरात स्वतंत्र पोलीस ठाण्याची निर्मिती झाल्यास वाढत्या गुन्हेगारीवर आळा बसेल. याकडे गांभिर्याने लक्ष देवून स्वतंत्र पोलीस ठाण्याची निर्मिती होणे आवश्यक आहे.

**बोगस शिक्षक भरती प्रकरण**

## तक्रारकर्त्यांचा २३ मार्चपासून पुणे येथे उपोषणाचा इशारा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : नाशिक विभागात मोठ्या प्रमाणावर झालेल्या कथित बोगस शिक्षक व शिक्षकेत्तर भरती प्रकरणी कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष राजकुमार छाजेड यांनी केली आहे. पंधरा दिवसात कारवाई न झाल्यास सोमवार, दि. २३ मार्चपासून पुणे येथील शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

याबात त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की नाशिक विभागात सुमारे १५ ते २० हजार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नियमबाह्य भरती झाली आहे. शासनाच्या ६ फेब्रुवारी २०१२ व २ मे २०१२ च्या शासन निर्णयातील नियमांची पूर्तता न करता, कोणतीही ‘एनओसी’ अथवा प्रस्ताव नसताना मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार करून बोगस मान्यता देण्यात आली आहे. या प्रक्रियेमुळे शासनाच्या तिजोरीवर अब्जावधी रुपयांचा आर्थिक भार पडला आहे. या प्रकरणी अनेकदा तक्रारी व माहिती अधिकाराद्वारे माहिती मागवूनही संबंधित अधिकारी, संस्था चालक, प्राचार्य व मुख्याध्यापक यांच्याकडून योग्य माहिती दिली जात नाही. काही ठिकाणी सुनावणीचे केवळ औपचारिक ढोंग केले जाते व निर्णय प्रलंबित ठेवले जातात. तसेच न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडली जात नसल्यामुळे आरोपींना स्थगिती मिळते. या कथित घोटाळ्याची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, शिक्षण संचालक, पोलीस अधिकारी, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांना पाठविण्यात आल्या आहेत.







*अमळनेर : पहिल्या व दुसऱ्या छायाचित्रात श्री मंगळ ग्रह मंदिरात मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिरात रुग्णांची तपासणी करताना नेत्ररोगतज्ज्ञ. शेवटच्या छायाचित्रात शिबिरास उपस्थित रुग्ण.*

## मोफत मोतीबिंदू तपासणी शिबीराचा १२७ जणांनी घेतला लाभ

### मंगळग्रह सेवा संस्थेचा उपक्रम; शस्त्रक्रियेसाठी ७१ रूग्ण पात्र

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मंगळ ग्रह सेवा संस्था, ना. गुलाबरावजी पाटील सोशल फाउंडेशन (पाळधी), संकल्प सेवा फाउंडेशन (धनवाडी) व आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल (पनवेल) यांच्यातर्फे रविवार, दि. १५ मार्च रोजी श्री मंगळ ग्रह मंदिरात मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिर झाले. या शिबिराचा १२७ रुग्णांनी लाभ घेतला. त्यापैकी ७१ रुग्ण मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले आहेत. मंगळवार, दि. १७ मार्च रोजी श्री मंगळग्रह मंदिर येथून विशेष वाहनाने आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल (पनवेल) येथे शस्त्रक्रियेसाठी त्यांना रवाना करण्यात येणार आहे.

या शिबिरात अमळनेर, धुळे, चोपडा, जळगाव, एरंडोलसह तालुक्यातील ग्रामीण भागातील रूग्णांचा सहभाग होता. डॉ. राहुल चौधरी, भुपेंद्र वाघ, विजय संमेसे, हर्षदा शिंदे, प्राची गायकवाड, योगेश कोळी, सागर पाटील यांनी तपासणी केली. मंगळ ग्रह सेवा संस्थेचे जनसंपर्क अधिकारी शरद कुलकर्णी, रजनीकांत पाटील, गणेश शिंदे, प्रमोद पाटील, नितेश बारी आदींनी सहकार्य केले. दरम्यान, सदर शिबिर दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी श्री मंगळ ग्रह मंदिर येथे नियमितपणे होते, याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे मंगळ ग्रह सेवा संस्थेतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

**दिनविशेष**
१६ मार्च

- राष्ट्रीय लसीकरण दिवस
- भारतात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचा ठराव ‘गोपाळकृष्ण गोखले’ यांनी मांडला.
- मुंबई उच्च न्यायालयाने दलितांना महाड येथील चवदार टाकीचे पाणी पिण्याचा अधिकार असल्याचा निर्णय दिला.
- प्रभात चा नई कहानी हा चित्रपट रिलीज झाला.
- भारतीय हॉकीपटू ‘धनराज पिल्ले’ आणि मध्यम अंतराची धावपटू ज्योतिमय सिकदर यांना के. के. बिर्ला पुरस्कार जाहीर केला.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

## ‘बार’मध्ये मद्याचे पेग रिचवत कर्मचाऱ्याने स्वीकारली ५० हजारांची लाच...!

### महसूल प्रशासनात खळबळ, ‘एसीबी’च्या जाळ्यात मोठे मासे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जिल्ह्यातील प्रशासकीय केंद्र असलेल्या जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सहायक आणि एका वरिष्ठ लिपिकाला एका ‘बार’ मध्ये ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात अटक केली. महसूल सहायक गोपाल महादेवराव मोहाडे (वय ४४) व वरिष्ठ लिपिक राहुल अरुणराव कुयटे (३८) अशी आरोपी कर्मचाऱ्यांची नावे आहेत. या कारवाईने महसूल




प्रशासनात खळबळ उडाली.

तक्रारदाराची कळंब तालुक्यातील मौजा मेंढला शिवारात शेतजमीन आहे. या जमिनीचे स्वरूप ‘भोगवटादार वर्ग-२’ असून त्यांना ते ‘भोगवटादार वर्ग-१’ मध्ये रूपांतरित करायची होती. त्यासाठी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात रीतसर अर्ज केला होता. ही प्रक्रिया तांत्रिक आणि कायदेशीर असल्याने महसूल विभागाची मंजुरी आवश्यक असते. या कामाचा पाठपुरावा करताना, जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सहायक गोपाल महादेवराव मोहाडे याने या कामाच्या मोबदल्यात ७५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. ही रक्कम स्वतः न स्वीकारता त्यांनी त्यांचे जुने सहकारी आणि सध्या पांढरकवडा तहसील कार्यालयात प्रतिनियुक्तीवर असलेले वरिष्ठ लिपिक राहुल अरुणराव कुयटे यांच्याकडे देण्यास सांगितले. लाचेची मागणी झाल्यामुळे तक्रारदाराने ६ मार्च रोजी यवतमाळच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली. एसीबीने तातडीने तक्रारीची पडताळणी केली. पडताळणीदरम्यान लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाले आणि तडजोडीनंतर ५० हजार रुपये देण्याचे ठरले. शुक्रवार, शहरातील गजबजलेल्या स्टेट बँक चौकातील ‘फ्रेंड्स बार’ मध्ये राहुल कुयटे हा मद्याचे पेग रिचवत लाच स्वीकारण्यासाठी बसला होता. त्यावेळी सापळा रचण्यात आला.

राहुल कुयटे याने तक्रारदाराकडून ५० हजार रुपयांची रोकड स्वीकारताच, दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने त्याला रंगेहात पकडले. या गुन्ह्यात मुख्य सूत्रधार असलेल्या गोपाल मोहाडे यालाही तातडीने ताब्यात घेण्यात आले. या दोन्ही आरोपींविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ च्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सामान्यतः ‘वर्ग-२’ जमिनीचे रूपांतर ‘वर्ग-१’ मध्ये करण्यासाठी शासनाचे विशिष्ट नियम आणि- शुल्क निर्धारित असते. मात्र, नियमानुसार काम करण्याऐवजी अशा प्रकारे खाजगी फायद्यासाठी पैशांची मागणी करणे हा गंभीर फौजदारी गुन्हा ठरतो. ही कारवाई अमरावती परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक मारुती जगताप, अप्पर पोलीस अधीक्षक अरुण सावंत, पोलीस उपअधीक्षक अभय आष्टीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या पथकाने केली. आरोपींच्या घरांची झडती घेण्यात आली.

## संपादकीय

# जरा पाहा दक्षिणी राज्यांकडे!

शेतकरी कर्जमाफीच्या प्रसिद्धीपुढे सिंचनावर यंदाच्या राज्य अर्थसंकल्पाने दिलेला भर दुर्लक्षित राहिला. नव्या सिंचन योजना हव्याच, पण राज्यात किती क्षेत्र सिंचनाखाली आहे हेही सरकारने नेमके सांगावे. फार वर्षांपूर्वी शालेय विद्यार्थ्यांस उद्देशून 'प्राप्तकाल हा विशाल भूधर, सुंदर लेणी तयात खोदा' असा सुविचार ज्येष्ठांकडून सर्रास दिला जात असे. अलीकडच्या विद्यार्थ्यांस सुविचारांची तितकी गरज नसावी. तथापि हे सुवचन सरकारांसाठी लागू पडेल. त्यांच्यासाठी 'प्राप्तकाल हा विशाल भूधर' आहेच. गगनचुंबी इमारतींचा विकास तेच दर्शवितो. या सुवचनाच्या उत्तरार्धात 'सुंदर लेणीं'च्या ऐवजी 'पायाभूती तयात खोदा' इतका बदल केला की झाले. महाराष्ट्राचा ताजा अर्थसंकल्प 'प्राप्तकाल हा विशाल भूधर, पायाभूती तयात खोदा' या नव–वचनाच्या निर्मितीची गरज व्यक्त करतो. कारण पायाभूत सोयी–सुविधांवर त्यात देण्यात आलेला भर. खरेतर केवळ महाराष्ट्रातच नव्हे; साऱ्या देशात हेच सुरू आहे. काही ना काही कामे काढत राहायची आणि कंत्राटदारांच्या उत्पन्नाची आवक सुरू राहील, याची व्यवस्था करायची. त्यात पुन्हा अलीकडचे हे 'जगात सर्वांत मोठे', 'जगात सर्वांत उंच', 'सर्वांत वेगवान' इत्यादीचे खूळ. तेव्हा 'पायाभूत सोयी–सुविधा उभारणी' हा सध्याचा परवलीचा शब्द आहे हे लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अर्थसंकल्पावर भाष्य करणे योग्य. खरेतर हा अर्थसंकल्प अजितदादा पवारांनी मांडला असता. त्यांच्या अकाली जाण्याने अर्थखाते मुख्यमंत्र्यांनी स्वत:कडे ठेवले. अजितदादांच्या कोणा राष्ट्रवादी सहकाऱ्याहाती हे महत्त्वाचे खाते त्यांनी दिले नाही, ही बाब पुरेशी सूचक. अर्थसंकल्प सादर होण्याआधी शेतकरी कर्जमाफी होणार हे दिसत होते. राजकारण प्रवेशाच्या उंबरठ्यावरचे माजी सनदी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या समितीकडून या कर्जमाफीची चाचपणी सुरू होती. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी २००८ मध्ये राष्ट्रीय स्तरावर दिलेली कर्जमाफी धरून आता जाहीर झालेली ही तिसरी कर्जमाफी. याआधी २०१७ या वर्षाच्या कर्जमाफीचा सुमारे ३१ हजार कोटी रुपयांचा बोजा सरकारने आपल्या डोक्यावर घेतला. जवळपास ४४ लाख शेतकऱ्यांना त्याचा फायदा झाला. त्यानंतर २०२४ वर्षाच्या कर्जमाफीने २० हजार कोटींचे भगदाड सरकारी तिजोरीस पाडले. त्याचा लाभ ३१ लाखांहून अधिक शेतकऱ्यांस झाला. आताच्या कर्जमाफीपायी या दोहोंच्या मधील रकमेचा अतिरिक्त भार सरकारवर पडेल.

एकदा लोकप्रियता मिळवायची हेच ध्येय असले की हा खर्च आलाच. तथापि तो करताना आधीच्या तीन कर्जमाफींचा फायदा ज्यांनी घेतलेला आहे त्यांना तरी या कर्जमाफीतून वगळण्याचे धाडस फडणवीस यांनी दाखवायला हवे. तितका सुधारणावादी दृष्टिकोन त्यांच्या ठायी आहे असे मानण्यास जागा आहे. असे न केल्यास 'कर्जे काढा, माफी मिळवा' असा नवा पायंडा या राज्यात पडेल. यात काही शेतकरी असे असतील की ज्यांनी प्रत्येक कर्जमाफीचा लाभ घेतलेला आहे. त्यांना आताही कर्जमाफी देणे अयोग्य. वास्तविक शेतकऱ्यांस कर्जमाफी जाहीर करणे ही सत्ताधाऱ्यांची गरज, शेतकऱ्यांची नव्हे. शेतकऱ्यांस त्यांच्या उत्पादनांस रास्त भाव तेवढा हवा. तोच देता येत नसल्याने राजकीय पक्षांत शेतकरी कर्जमाफीसाठी अहमहमिका सुरू असते. ताजी घोषणा याच स्पर्धेचा एक भाग. महाराष्ट्रासारख्या प्रगतिशील राज्याने किती काळ हा कर्जमाफीचा, लाडक्या बहिणींचा खेळ करत राहायचा यास मर्यादा आहेत. पुढील चार वर्षे कोणत्याही निवडणुका क्षितिजावर नसल्याने या मर्यादा–भंगाचे धाडस सरकारने दाखवणे अपेक्षित. ही कर्जमाफी वगळता या क्षेत्रासाठी एकात्मिक मूल्यसाखळी, कृषी विद्यापीठांस अधिक सक्षम करणे, शेतीत भांडवली गुंतवणूक वाढावी यासाठी ठोस प्रयत्न इत्यादी नावीन्यपूर्ण घटक या संकल्पात आहेत. पण कर्जमाफीच्या घोषणेच्या प्रसिद्धी प्रकाशात ते दुर्लक्षित राहतात. शेतीइतकाच सिंचनावरही या संकल्पात भर आहे. नवीन सिंचन योजना, स्थानिक पातळीवर नदीजोड, पाणी वळवणे इत्यादी. ते योग्यच. पण इतके करूनही सरकार या राज्यात सिंचनाखालील क्षेत्र किती ते का सांगत नाही हा प्रश्नच. गेली कित्येक वर्षे हे असेच सुरू आहे. सिंचन तरतुदी, नव्या योजना इत्यादी जाहीर करायच्या खऱ्या. पण त्याचा लाभ मिळून किती जमीन ओलिताखाली आहे, हेदेखील कळायला हवे. नपेक्षा सिंचनावरील खर्च म्हणजे बूड नसलेल्या भांड्यातील साठवणूक असा अर्थ निघेल. बाकी कोणत्याही अर्थसंकल्पात असतात तशा घोषणा यातही आढळतात. पण त्यात कोणताही आचरटपणा दिसत नाही.

पुढील वर्षापर्यंत महाराष्ट्राच्या डोक्यावरील उरलेल्या ४५ टक्क्यांनी १३ कोटींच्या महाराष्ट्राचे भले करायचे. त्यासाठी सरकारी उत्पन्न वाढायला हवे. हे कसे होणार हे दिसत नाही. परिणामी सार्वजनिक आरोग्यापेक्षा लाडक्या बहिणींच्या महिन्याच्या शेवटी हातातोंडाची गाठ घालण्यासाठी हातउसने घ्यावे लागतात. कर्ज ११ लाख कोटी रुपयांवर जाईल. म्हणजे त्यात दोन लाख कोटी रुपयांची वाढ एका वर्षात होईल. या कर्जाच्या व्याजापोटीच ६५ हजार कोटी रुपये राज्य सरकार मोजेल. त्यात वेतन आणि निवृत्तिवेतनादी हक्काचे खर्च. राज्याच्या एकूण महसुलाच्या ५५ टक्के खर्च यातच जातो. म्हणजे मासिक ओवाळणीवर अधिक खर्च करण्याची वेळ राज्यास येते. आपले ईप्सित आहे ते लवकरात लवकर 'वन ट्रिलियन डॉलर्स'ची अर्थव्यवस्था बनण्याचे. डॉलरचा दर ९३ रुपये असा धरला तर आपणास ९३ लाख कोटी रुपयांचे लक्ष्य गाठावयाचे आहे, असा त्याचा अर्थ. तूर्त आपला आकार आहे ५१–५२ लाख कोटी रुपयांचा. म्हणजे आपणास आपल्या उत्पन्नात दुपटीने वाढ करावी लागणार. आहे ती कमाई दुप्पट करण्यात व्यक्ती असो वा व्यवस्था. त्यास किती काळ आणि कष्ट करावे लागतात ते वेगळे सांगण्याची गरज नाही. तूर्त आपला अर्थसंकल्प ४० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक तूट दर्शवतो. सुधीर मुनगंटीवार यांचा एक अपवादवगळता अन्य कोणा अर्थमंत्र्यांस शिलकी अर्थसंकल्प सादर करता आलेला नाही. सध्याची ही तूट मर्यादेत आहे हे खरे. पण खर्च वजा जाता आपल्या तिजोरीत काही श्रीशिल्लक राहत नाही, उलट महिन्याच्या शेवटी हातातोंडाची गाठ घालण्यासाठी हातउसने घ्यावे लागतात. अशावेळी गरज आहे ती यातील त्वरेची. तमिळनाडू, कर्नाटक, तेलंगण, आंध्र प्रदेश आदी दक्षिणी राज्ये अधिकाधिक स्पर्धात्मकता दाखवू लागलेली असताना उत्तर–दक्षिणेच्या सांदीतील महाराष्ट्रास दक्षिण–सान्निध्यासाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. त्याची जाणीव या अर्थसंकल्पातून होते.

# इराण– इस्त्रायल युद्धामुळे गॅसचा तुटवडा...!

## 'साई संस्थान'ची 'सोलर कुकिंग सिस्टीम' ठरतेय आदर्श...!!

### केंद्र सरकारकडून गौरव

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

इराण– इस्त्रायल यांच्यातील संघर्षामुळे एलपीजी गॅसच्या पुरवठ्याबाबत चिंता वाढत आहे. मात्र, शिर्डीच्या साईबाबा मंदिरात उभारलेली सोलर कुकींग सिस्टीम आदर्श ठरत आहे. या प्रणालीद्वारे दररोज हजारो भाविकांसाठी सौर ऊर्जेवर अन्न शिजवले जाते. त्यामुळे संस्थानाची कोट्यवधी रुपयांची इंधन बचत होत आहे. या उपक्रमाची दखल घेऊन केंद्र सरकारनेही या प्रकल्पाला देशातील युनिक मॉडेल म्हणून गौरविले आहे.

सुमारे ४० हजार भाविक रोज जेवतात

शिर्डीत दररोज देशभरातून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. सरासरी ७५ ते ८० हजार भाविक रोज शिर्डीत दाखल होतात. त्यांच्यासाठी साई संस्थानातर्फे मोफत भोजनाची व्यवस्था करण्यात येते. प्रसादालयात पोळी, भाजी, डाळ– भात आणि एक गोड पदार्थ असा साधा व पौष्टिक मेनू दिला जातो. मोफत भोजनामुळे दररोज सुमारे ४० हजार भाविक या प्रसादालयात जेवणाचा लाभ घेतात, अशी माहिती मंदिर प्रशासनाने दिली.

#### दररोज २८०० किलो स्टिम

पूर्वी इतक्या मोठ्या प्रमाणात स्वयंपाक करण्यासाठी दररोज सुमारे १७०० किलो एलपीजी गॅस लागत होता त्यामुळे संस्थानावर मोठा आर्थिक भार पडत होता. वाढता खर्च आणि ऊर्जा बचतीची गरज लक्षात घेऊन जुलै २००९ मध्ये साई संस्थानाच्या विश्वस्त मंडळाने सोलर कुकींग सिस्टीम उभारण्याचा निर्णय घेतला. या प्रकल्पांतर्गत प्रसादालय परिसरात ७३ सौर



डिश बसविण्यात आल्या. सूर्याच्या किरणांपासून उष्णता निर्माण करून त्यातून वाफ तयार केली जाते. या प्रणालीद्वारे दररोज सुमारे २८०० किलो स्टिम तयार होते. त्या वाफेच्या सहाय्याने मोठ्या कुकरमध्ये अन्न शिजवले जाते. त्यामुळे गॅसची मोठ्या प्रमाणात बचत होत असून हा प्रकल्प ऊर्जा बचतीचा प्रभावी आदर्श ठरला आहे.

#### कुकींग सिस्टीम आणि ऊर्जा बचत

शिर्डी साई संस्थानने प्रसादालयात १५० लिटर क्षमतेचे १० मोठे कुकर बसविण्यात आले आहेत. या कुकरमध्ये काही मिनिटांत मोठ्या प्रमाणावर अन्न तयार केले जाते. सोलर कुकींग सिस्टीमच्या माध्यमातून एकावेळी १५ क्विंटल भात, ५ क्विंटल डाळ आणि ५ क्विंटल भाज्या शिजवल्या जातात. दररोज सुमारे २ हजार किलो अन्न या प्रणालीच्या माध्यमातून तयार होते. या प्रणालीमुळे दररोज सुमारे २०० किलो एलपीजी गॅसची बचत होते. २००९ साली सुमारे १ कोटी ३७ लाख रुपये खर्च करून हा प्रकल्प उभारण्यात आला. २००९ ते २००६ या कालावधीत दोन लाख किलोपेक्षा अधिक गॅसची बचत झाली. संस्थानाची दोन कोटी रुपयांपेक्षा जास्त आर्थिक बचत झाली आहे. परिणामी हा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या तसेच पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत फायदेशीर ठरला आहे.

**प्रेरणादायी प्रयोग**

खरे तर इस्त्रायल– इराण युद्धामुळे जागतिक स्तरावर इंधन पुरवठ्यावर ताण निर्माण झाला आहे. सौर ऊर्जेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर स्वयंपाक करण्याचा शिर्डी साई संस्थानाचा प्रयोग देशातील इतर धार्मिक संस्था, मोठी प्रसादालये आणि सामुदायिक स्वयंपाक केंद्रांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.


सोलर कुकींग सिस्टीमसह साई संस्थानाने भाविकांसाठी सौर ऊर्जेच्या माध्यमातून गरम पाण्याची सुविधा देखील उपलब्ध करून दिली आहे. नवीन भक्त निवास, द्वारावती, शांतिनिकेतन, साई अतिथीगृह तसेच साई आश्रम फेज १ व फेज २ मधील सुमारे १० हजारांहून अधिक भाविकांना २४ तास मोफत गरम पाणी उपलब्ध आहे. त्यामुळे ऊर्जा बचत होण्यासोबतच भाविकांची मोठी सोय झाली आहे.

#### सौर ऊर्जा प्रकल्पाचे कौतुक

ऊर्जा बचत आणि संवर्धनासाठी शिर्डी साई बाबा मंदिर संस्थानाने राबविलेल्या अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पाचे विविध स्तरांवर कौतुक झाले आहे. इंधनाची मोठ्या प्रमाणावर बचत केल्याबद्दल राज्य सरकारने यापूर्वीच संस्थानाचा गौरव केला आहे. केंद्र सरकारच्या नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयानं साई संस्थानाच्या सोलर कुकींग सिस्टीमला देशातील युनिक मॉडेल म्हणून निवडले आहे. सौर ऊर्जेच्या प्रभावी वापराबद्दल केंद्र सरकारने संस्थानाचा सन्मान केला असल्याची माहिती साईबाबा प्रसादालयाचे सहायक अभियंता शरद शिरोळे यांनी दिली.

# मोफत धान्य वितरणाबाबत केंद्र सरकारचा महत्त्वाचा निर्णय

### राज्यांना दिल्या 'या' सूचना?



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : केंद्र सरकारने मोफत रेशन धान्य वितरण योजनेसंदर्भातील महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यात जून २०२६ पर्यंत ३ महिन्याचे वितरित होणारे तांदूळ आणि गहू केंद्रीय साठ्यातून आगाऊ उचलून नागरिकांपर्यंत तातडीने पोहोचवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या संदर्भात सचिवांना पत्र पाठवून मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

केंद्राच्या पत्रानुसार, आगामी गहू खरेदी हंगाम सुरू होणार असल्यामुळे गोदामांवर ताण येऊ नये, यासाठी राज्यांनी नियोजित वाटपातील धान्य लवकर उचलावे. साठवणूक क्षमता आणि वाहतूक व्यवस्थेवरील दबाव लक्षात घेऊन लाभार्थ्यांपर्यंत धान्य त्वरित पोहोचवण्यावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे सरकारी गोदामांमध्ये नव्याने खरेदी होणाऱ्या धान्यासाठी जागा उपलब्ध होईल. या प्रक्रियेसाठी केंद्र सरकारने फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांनाही महत्त्वाचे आदेश दिले आहेत. राज्य सरकारांशी समन्वय साधून आवश्यक तेवढा धान्यसाठा गोदामांमध्ये उपलब्ध राहील, याची खात्री करण्यास सांगितले आहे. तसेच नवीन धान्य खरेदी प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी आवश्यक तयारी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, सध्या एफसीआयकडे ३७. २ दशलक्ष टन तांदूळ आणि २३. ५ दशलक्ष टन गहू उपलब्ध आहे, जो सामान्य साठ्यापेक्षा १८५ टक्के जास्त आहे. त्यामुळे या धान्याचा फायदा ८० कोटींपेक्षा जास्त लाभार्थ्यांना होणार आहे. या धोरणामुळे राज्यातील लाभार्थ्यांना नियमित आणि सुरक्षित रेशन वितरणाची खात्री मिळणार आहे, तर केंद्रातील साठा व्यवस्थापनही सुरू राहणार आहे.




# अतिसूंदर, देखणा सूर्यपक्षी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**नाव :** सूर्यपक्षी Sunbird

**रंग :** नराचा रंग लखलखीत निळसर जांभळा. मादीचे वरचे अंग राखाडी तपकिरी तर पोट फिकट पिवळे.

**चोच :** सुई सारखी लांब बारीक. नळी सारखी वाकलेली.

**डोळे :** लहान, बारीक, तिक्ष्ण. डोळ्यांचा रंग गडद तपकिरी.

**शेपूट :** लहान, चौकोनी, चमकदार असते. मादीला आकर्षित करतांना नर शेपूट उडवितो.

**घरटे :** सूर्यपक्षाचे घरटे झाडाच्या फांदीला लटकणारे असून ते गवत व पाने या पासून तयार केलेले असते.

**अन्न :** सूर्यपक्षी बाकदार चोचीने फुलातील रस खातो. परागकण किटक, किडे हे त्याचे भक्ष आहे.

**अंडी :** मादी एप्रील मे महिन्यात दोन किंवा तीन अंडी देते. या अंड्याचा आकार लहान निमूळता असून रंग फिकट हिरवा राखाडी असतो.

**इतर वैशिष्ट्ये :** भारतभर आढळतो. सुंदर देखणा पक्षी मानले जाते. या पक्षाच्या अंगाला मेटॅलिक लकाकी आहे. फुलझाडीत याचा गुणगुणणारा ध्वनी सतत ऐकू येतो.

**संग्राहक : प्रा. प्रकाश धर्माधिकारी, निसर्ग मित्र मंडळ, अमळनेर.**



### निधन वार्ता — प्रा. डॉ. दीपक बाविस्कर


ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील जिनगर गल्लीतील मूळ रहिवासी व धुळे येथील अभय बी.एड. महाविद्यालयाचे प्राध्यापक व 'अंनिस'चे ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. दीपक रामदास बाविस्कर (वय ५५) यांचे शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी दुपारी चारच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे. किशोर रामदास बाविस्कर यांचे ते बंधू, तर पालिकेतील सेवानिवृत्त कर निरीक्षक ज्ञानेश्वर बिऱ्हाडे यांचे ते भाचे होत.

# उन्हाळ्यात ताक पिताय मग 'या' पाच चुका आवर्जून टाळा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : सध्या मार्चमध्ये मे हीटचा उकाडा अनुभवास येत आहे. उन्हाळ्यात शीतपेय मोठ्या प्रमाणात घेतले जातात. यात ताकाची मोठी मागणी असते. मात्र, ताक पितांनाही काळजी घेणे आवश्यक असते. या पाच चुका आवर्जून टाळणे गरजेचे असल्याचे तज्ज्ञ सांगतात.



१. फ्रिजमधील थंड ताक टाळा

जास्त थंड ताकामुळे घसा दुखणे, सर्दी होणे किवा पचनक्रिया मंदावण्याची शक्यता असते. त्यामुळे रूम टेंपरेचरचे ताक प्यावे.

ताजे ताकच उत्तम

जास्त आंबट किवा शिळे ताक प्यायल्याने ॲसिडिटी, पोटात जळजळ आणि बॅक्टेरियामुळे पचनाचे विकार होऊ शकतात.

२. पॅकेज्ड ताक नको

बाजारातील विकतच्या ताकात प्रिझर्वेटिव्ह आणि अतिरिक्त मीठ असते, जे रोजच्या वापरासाठी आरोग्यास हानिकारक ठरू शकते.

घरगुती ताकाचा वापर

शक्यतो घरी बनवलेले ताजे आणि नैसर्गिक ताक आरोग्यासाठी सर्वाधिक फायदेशीर आणि सुरक्षित असते.

३. रात्रीचे सेवन टाळा

रात्री ताक घेतल्याने कफ वाढणे, घसा बसणे किवा अपचनाचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे ते दुपारी घेणे सर्वोत्तम आहे.

चुकीचे अन्न संयोजन

ताकासोबत साखर किंवा आंबट फळे घेऊ नका, कारण यामुळे शरीरातील नैसर्गिक संतुलन बिघडून पोटाचे त्रास होतात.

४ – माशासोबत टाळा

मासे आणि ताक हे 'विरुद्ध अन्न' मानले जाते. त्यांचे एकत्र सेवन केल्याने पचन बिघडते आणि त्वचेच्या समस्या उद्भवू शकतात.

५. ताक पिण्याची योग्य पद्धत

ताकात सैंधव मीठ, जिरे पूड किवा कोथिंबीर घालून घेतल्यास त्याची पचनशक्ती आणि चव दोन्ही वाढते.

दुपारची वेळ सर्वोत्तम

ताक नेहमी दुपारच्या जेवणानंतर किंवा जेवणासोबत घेतल्यास अन्नाचे पचन नीट होण्यास मदत मिळते.

## रोज एक लिंबू खाल्ल्यावर शरिरात कोणकोणते बदल होतील?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

रोज एक लिंबू खाणे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरू शकते. लिंबू हे व्हिटॅमिन सी आणि अँटी ऑक्सिडंट्सचा उत्तम स्रोत आहे. लिंबामध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन सी असते, जे शरीराची रोगप्रतिकारशक्ती मजबूत करते. त्यामुळे संसर्गजन्य आजारांपासून शरीराचे संरक्षण होते. सकाळी कोमट पाण्यात लिंबू पिळून प्यायल्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत होते.



लिंबू हे हे यकृत्ताला पित्त रस तयार करण्यास उत्तेजित करते, ज्यामुळे पचन सुलभहोते आणि अपचनाचा त्रास कमी होतो. व्हिटॅमिन सी कोलाजनच्या निर्मितीसाठी आवश्यक असते. त्यामुळे त्वचा लवचिक आणि तरुण राहते. रोज लिंबू खाल्याने रक्तातील अशुद्धी दूर होऊन चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते आणि पिपल्सचा त्रास कमी होऊ शकतो.

लिंबू पाणी शरीरातील मेटाबॉलिझम वाढविते. त्यामुळे चरबी जाळण्याची प्रक्रिया वेगवान होते. लिंबूमध्ये असलेल्या सायट्रिक ॲसिडमुळे लघवीतील सायट्रेटचे प्रमाण वाढते, जे किडनी स्टोन (खडा) तयार होण्यास प्रतिबंध करते किवा लहान खडे विरघळण्यास मदत करते.

लिंबू खाताना काही पथ्य पाळावी लिंबू थेट दातांनी चावून खाऊ नये, कारण त्यातील आम्लामुळे दातांचे कवच खराब होऊ शकते.

योग्य पद्धत : लिंबू रस कोमट पाण्यात किवा अन्नावर पिळून घेणे सर्वात चांगले असते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com

# अभिनव भारताचे संस्थापक, क्रांतिकारक : गणेश सावरकर



स्मृतिदिन विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात अनेक ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांनी आपल्या त्याग, साहस आणि राष्ट्रनिष्ठेने इतिहास घडवला. अशाच अग्रगण्य क्रांतिकारकांपैकी एक म्हणजे गणेश दामोदर सावरकर. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे मोठे बंधू म्हणून ओळखले जाणारे गणेश दामोदर सावरकर हे स्वतःही एक थोर क्रांतिकारक, विचारवंत आणि संघटक होते. त्यांनी स्थापन केलेल्या अभिनव भारत सोसायटी या गुप्त क्रांतिकारक संघटनेने भारतीय स्वातंत्र्यलढ्याला एक नवी दिशा दिली.

### प्रारंभिक जीवन

गणेश दामोदर सावरकर यांचा जन्म १३ जून १८७९ रोजी भगूर येथे झाला. त्यांचे वडील दामोदरपंत सावरकर आणि आई राधाबाई सावरकर हे धार्मिक व राष्ट्रप्रेमी होते. लहानपणापासूनच सावरकरांवर देशभक्तीचे संस्कार झाले. बालपणातच त्यांनी शिक्षणाबरोबरच समाजातील अन्याय आणि परकीय सत्तेचा परिणाम यांचा गंभीरपणे विचार सुरू केला. त्यांच्या कुटुंबातच क्रांतिकारक विचारांची परंपरा होती. पुढे त्यांचे धाकटे बंधू विनायक दामोदर सावरकर आणि नारायण सावरकर यांनीही स्वातंत्र्यलढ्यात मोठे योगदान दिले.

### ‘अभिनव भारत’ची स्थापना

१९०४ मध्ये गणेश दामोदर सावरकर आणि विनायक दामोदर सावरकर यांनी मिळून अभिनव भारत सोसायटी या गुप्त क्रांतिकारक संघटनेची स्थापना केली. या संघटनेचे उद्दिष्ट ब्रिटीश सत्तेविरुद्ध सशस्त्र क्रांती घडवून भारताला स्वातंत्र्य मिळवून देणे हे होते. या संघटनेत अनेक तरुण क्रांतिकारक सामील झाले. गुप्त बैठक, देशभक्तीपर साहित्य, शस्त्रसाठा आणि ब्रिटिशांविरुद्ध आंदोलन यांद्वारे त्यांनी स्वातंत्र्यलढ्याची ज्वाला प्रज्वलित ठेवली. अभिनव भारत संघटनेमुळे महाराष्ट्रासह देशभरातील तरुणांमध्ये राष्ट्रभक्तीची प्रेरणा निर्माण झाली.

### ब्रिटीश सत्तेविरुद्ध संघर्ष

गणेश दामोदर सावरकर यांच्या कार्याची माहिती ब्रिटीश सरकारला मिळताच त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात आली. १९०९ मध्ये त्यांना अटक करण्यात आली आणि ब्रिटिशांनी त्यांना आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली. त्यांना अंदमानमधील कुप्रसिद्ध सेल्यूलर जेल येथे पाठविण्यात आले. त्या काळात कारागृहातील कैद्यांना अमानुष छळ सहन करावा लागत होता. तरीही सावरकरांनी आपली राष्ट्रनिष्ठा आणि स्वातंत्र्याची ज्वाला कायम ठेवली.

### विचार आणि साहित्य

कारावासात असतानाही त्यांनी लेखन आणि चिंतन चालू ठेवले. त्यांच्या लेखनातून राष्ट्रभक्ती, स्वातंत्र्याची आस आणि समाजजागृतीचा संदेश दिला गेला. त्यांच्या कार्यामुळे अनेक तरुणांमध्ये स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा निर्माण झाली.

### स्वातंत्र्यलढ्यातील योगदान

गणेश दामोदर सावरकर यांचे योगदान केवळ क्रांतिकारक चळवळीतच मर्यादित नव्हते; त्यांनी भारतीय समाजात राष्ट्रभावना जागृत करण्याचे मोठे काम केले. अभिनव भारतसारख्या संघटनेद्वारे त्यांनी स्वातंत्र्यलढ्याला संघटनात्मक रूप दिले.


### स्मृतिदिनाचे महत्त्व

१६ मार्च रोजी त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे कार्य आणि त्याग आठवणे म्हणजे केवळ इतिहास स्मरण करणे नव्हे, तर देशभक्तीची प्रेरणा घेणे होय. अशा क्रांतिकारकांच्या बलिदानामुळेच भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले. गणेश दामोदर सावरकर हे भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी स्थापन केलेल्या अभिनव भारत सोसायटीमुळे अनेक तरुणांना देशासाठी लढण्याची प्रेरणा मिळाली.

**त्यांना स्मृतिदिनानिमित्त दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे अभिवादन व श्रद्धांजली.**

# पराक्रमी सेनानी : मल्हारराव होळकर

जन्मदिन विशेष



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मराठा साम्राज्याच्या इतिहासात धैर्य, शौर्य आणि दूरदृष्टी यांचे विलक्षण मिश्रण असलेले नाव म्हणजे मल्हारराव होळकर. मराठा साम्राज्याच्या विस्तारात त्यांनी बजावलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. एका साध्या धनगर कुटुंबातून पुढे येऊन त्यांनी मराठा सैन्यात सर्वोच्च स्थान मिळवले आणि पुढे होळकर घराण्याची मजबूत पायाभरणी केली. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या कार्याचा आणि पराक्रमाचा आढावा घेणे हे इतिहासाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासारखे आहे.

### प्रारंभिक जीवन

मल्हारराव होळकर यांचा जन्म १६ मार्च १६९३ रोजी होळ येथे झाला. त्यांचे वडील खंडोजी होळकर हे धनगर समाजातील होते. लहान वयातच वडिलांचे निधन झाल्यामुळे मल्हाररावांचे बालपण कठीण परिस्थितीत गेले. त्यांच्या आईने त्यांचे संगोपन मोठ्या कष्टाने केले. बालपणापासूनच त्यांच्यात धाडस, नेतृत्वगुण आणि युद्धकौशल्य दिसून येत होते. पुढे त्यांनी मराठा सैन्यात प्रवेश करून आपल्या पराक्रमामुळे लवकरच वरिष्ठांचे लक्ष वेधून घेतले.

### मराठा सैन्यातील उदय

मल्हारराव होळकर यांनी मराठा साम्राज्याचे पराक्रमी पेशवे बाजीराव (पहिला) यांच्या सैन्यात काम करण्यास सुरूवात केली. बाजीराव पेशव्यांच्या उत्तर भारतातील मोहिमांमध्ये मल्हाररावांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या धाडसी नेतृत्वामुळे मराठा सैन्याने उत्तर भारतात मोठा प्रभाव निर्माण केला. मल्हाररावांच्या रणनीतीमुळे मराठ्यांना अनेक लढायांमध्ये यश मिळाले.

### होळकर घराण्याची स्थापना

मराठा साम्राज्याच्या विस्तारात मोठे योगदान दिल्याबद्दल मल्हाररावांना मालवा प्रदेशाची जबाबदारी देण्यात आली. त्यांनी इंदूर येथे आपले मुख्यालय स्थापन केले आणि पुढे तेथूनच होळकर घराण्याची सत्ता मजबूत झाली. मल्हाररावांनी मालवा प्रदेशात प्रशासन सुव्यवस्थित केले, व्यापार वाढवला आणि प्रजेला सुरक्षितता दिली. त्यांच्या कारकिर्दीत इंदूर शहराचा विकास झाला आणि पुढे ते होळकर राज्याची राजधानी बनले.

### लढाया आणि पराक्रम

मराठा साम्राज्याच्या अनेक मोहिमांमध्ये मल्हारराव होळकर यांनी महत्त्वाची भूमिका निभावली. उत्तर भारतातील मराठा सत्तेच्या विस्तारासाठी त्यांनी अनेक लढाया केल्या. त्यांनी मुघल आणि इतर प्रादेशिक सत्तांविरुद्ध लढून मराठा साम्राज्याचा प्रभाव वाढविला. त्यांचे युद्धकौशल्य, वेगवान घोडदळ आणि रणनीती यामुळे ते मराठा सैन्यातील अत्यंत विश्वासू सेनापती बनले.


### अहिल्याबाई होळकरांना दिलेले मार्गदर्शन

मल्हाररावांचे कुटुंबही पुढे मराठा इतिहासात अत्यंत महत्त्वाचे ठरले. त्यांच्या सुनेने म्हणजेच अहिल्याबाई होळकर यांनी पुढे मालवा राज्य अत्यंत कुशलतेने चालवले.
मल्हाररावांनी अहिल्याबाईंना प्रशासन, न्याय आणि प्रजेची सेवा यांचे महत्त्व शिकविले. त्यामुळेच पुढे अहिल्याबाई होळकर या भारतीय इतिहासातील सर्वांत आदर्श आणि लोकाभिमुख राज्यकर्त्यांपैकी एक ठरल्या.

### निधन आणि वारसा

मल्हारराव होळकर यांचे २० मे १७६६ रोजी निधन झाले. मात्र त्यांनी उभारलेले होळकर घराणे आणि त्यांची प्रशासन व्यवस्था पुढे अनेक वर्षे टिकून राहिली. त्यांनी उभारलेले राज्य आणि परंपरा पुढे अहिल्याबाई होळकर यांच्या काळात सुवर्णयुगात पोहोचले. मराठा साम्राज्याच्या इतिहासात मल्हारराव होळकर हे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. एका सामान्य कुटुंबातून पुढे येऊन त्यांनी मराठा साम्राज्याच्या विस्तारात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आणि होळकर घराण्याची भक्कम पायाभरणी केली. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या पराक्रमाची आठवण करून देणे आणि त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

# हिंदूंचे पवित्र तीर्थक्षेत्र ‘गिरनार’



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गिरनारच्या पायऱ्या खरच खूप अवघड आहे, एवढे अवघड बांधकाम कोणी आणि कसे केले असेल या प्रश्नांची उत्तरे आणि पायऱ्या कोणी आणि कशा तयार केल्या याचा इतिहास तुमच्यासाठी येथे देत आहे. एका मुस्लीम शासकाच्या काळात हिंदूंना आपल्या धर्मस्थळाची दुरुस्ती करण्यासाठी किंवा तेथे जाण्यासाठी काय-काय करावे लागायचे, याबद्दल गुजरातमधील जुनागडची एक रोचक ऐतिहासिक गोष्ट.

इ.स. १८८९, ठिकाण जुनागड. १८५७ च्या क्रांतीला ३२ वर्षे झाली होती. त्या वेळेस इंग्रजांनी जवळपास संपूर्ण भारतावर ताबा मिळविला होता. अनेक रियासती इंग्रजांच्या अखत्यारीत आल्या होत्या. त्यापैकी एक रियासत म्हणजे गुजरातमधील जुनागड, ज्याचे नवाब बहादूर खान होते. जुनागडमध्येच उंच गिरनार पर्वत आहे. जेथे हिंदू धर्मातील शतकानुशतके जुने दत्तात्रेय मंदिर आहे. येथे केवळ हिंदूच नाही तर जैन धर्माचीही अनेक देवळे व देरासर आहेत. आज गिरनार चढण्यासाठी रोप-वे आणि पायऱ्या आहेत. पण पूर्वी श्रद्धाळूंना सरळ डोंगर चढावा लागायचा. अनेक महिने लागायचे. अनेक लोक मृत्युमुखी पडायचे किंवा जंगली प्राणी त्यांना मारायचे.

एके दिवशी नवाबांचे दिवाण हरिदास बिहारीदास देसाई आणि नवाबांचे पर्सोनेल असिस्टंट पुरुषोत्तमराज झाला यांनी योग्य वेळ पाहून नवाबांसमोर विनंती ठेवली, की ‘हिंदू आणि जैन श्रद्धाळूंना गिरनारवर जाणे खूप कठीण होते आहे. लोक मरत आहेत. तर वर जाण्यासाठी पायऱ्या बांधता येतील का?’ नवाबांनी मग अहमदाबादमधून एक ब्रिटीश इंजिनिअरलाला बोलावले. त्याने पाहणी करून सांगितले, की गिरनारपर्यंत पायऱ्या बांधण्याचा खर्च एक लाख तीस हजार रुपये येईल. १८८९ मध्ये एक लाख ३० हजार रुपये ही अत्यंत मोठी रक्कम होती. नवाबांना हे ऐकून धक्का बसला आणि त्यांनी नकार दिला. तेव्हा हरिदास देसाई आणि पुरुषोत्तमराज झाला म्हणाले, की ‘आपण सरकारी खजिन्यातून पैसे देऊ नका. आम्ही एक लॉटरी काढतो. लोक १ रुपयाची लॉटरी खरेदी करतील. आकर्षक बक्षिसे ठेवू आणि लॉटरीच्या गजटमध्ये स्पष्ट लिहू की हा पैसा गिरनारसाठी पायऱ्या बांधायला वापरला जाणार आहे, त्यामुळे हिंदू-जैन लोक मोठ्या संख्येने लॉटरी खरेदी करतील.’ हे ऐकून नवाबांनी परवानगी दिली. यानंतर १२ सदस्यांची एक समिती तयार झाली, ज्यांचे प्रमुख होते बेचरदास बिहारीदास.

१ ऑक्टोबर १८८९. १ रुपयांची लॉटरी जाहीर करण्यात आली. पहिले बक्षीस ४० हजार रुपये ठेवण्यात आले, नंतर ते १० हजार केले. सर्वांत कमी बक्षीस ५ रुपये होते. लॉटरीची जाहिरात जुनागडच्या राज्य गॅझेट ‘दस्तूर-उल-अमल सरकार’मध्ये प्रकाशित झाली. लॉटरीची स्कीम आकर्षक होती. १२ तिकिटे खरेदी केली तर १ तिकीट फ्री. १०० तिकिटे विकणाऱ्याला १५ टक्के कमीशन. न विकलेली तिकिटे परत करण्याची सोय. हे पाहून हिंदू, मुस्लीम, शीख आणि अगदी इंग्रजांनीही मोठ्या प्रमाणावर लॉटरी खरेदी केली. १५ मे १८९२, रविवार लॉटरीचे निकाल जाहीर होणार होते. भारतभरातून हजारो लोक जुनागडला जमले. तिकिटे फारजखान यांच्या घरात ठेवली होती. समितीने पूर्ण पारदर्शकतेने ड्रॉ काढला. एकूण एक लाख २८ हजार ६६३ तिकिटे विकली गेली. १० हजार रुपयांचे पहिलं बक्षीस मुंबईतील सविताबेन दाह्याभाई खांडवाला यांना मिळाले. त्यांनी संपूर्ण रक्कम गिरनारच्या पायऱ्या बांधण्यासाठी अर्पण केली. (१८९२ मधील १०,००० रु.= आजचे जवळपास १०० कोटी). दुसरे बक्षीस २,५०० रु. पंजाबच्या खुदाबक्ष आणि लालचंद यांना मिळाले. तिसरे बक्षीस १,५०० रु. नवसारीच्या बलवंतराय यांना मिळाले. लॉटरीतून जवळपास एक लाख ३० हजार रुपये जमा झाले आणि ब्रिटीश इंजिनिअरच्या देखरेखीखाली पायऱ्या बांधण्याचे काम सुरू झाले.

### पायऱ्या बांधायला १९ वर्षे लागली.

आज आपण गिरनारवर सहज पायऱ्यांनी चढतो, पण हे विसरून जातो की आपल्या पूर्वजांनी त्यासाठी किती मोठी मेहनत, धावपळ आणि आयोजन केले होते. ज्या फोटोमध्ये दिसतेय, ते त्या जुन्या गिरनार लॉटरीचे तिकीट आहे, ज्यावर लिहिले आहे की या लॉटरीसाठी जुनागडच्या नवाबांनी विशेष परवाना दिला आहे. डाव्या बाजूला लॉटरी समितीचे सेक्रेटरी पुरुषोत्तम के. गांधी यांचे नाव लिहिलेले दिसते.

# आई धुणीभांडी करायची, वडील वॉचमन; पुण्याच्या तरुणाने थेट यूपीएससी परीक्षेत मिळविले यश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी

जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीवर कशी मात करता येते, याचा आदर्श पुण्यातील बापूसाहेब रतन गायकवाड या तरुणाने घालून दिला आहे. बापूसाहेब गायकवाड याने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) नागरी सेवा परीक्षेत बापूसाहेबने ५६१ वा क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे.



अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत वाढलेल्या बापूसाहेबचा हा प्रवास सोपा नव्हता. ज्या वेळी घरात दोन वेळच्या जेवणाची भ्रांत होती, अशा काळातही त्याने आपले ध्येय ढळू दिले नाही. बापूसाहेबची आई दुसऱ्यांच्या घरी धुणीभांडी करून संसाराला हातभार लावत होती, तर वडील वॉचमन म्हणून रात्रंदिवस कर्तव्य बजावत होते. पालकांच्या कष्टाचे चीज करत बापूसाहेबने मिळवलेले हे यश केवळ गायकवाड कुटुंबासाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी अभिमानास्पद ठरले आहे.

बापूसाहेब या तरुणाचा शैक्षणिक आणि संघर्षाचा प्रवास थक्क करणारा आहे. २००४ ते २००९ हा काळ त्यांच्या कुटुंबासाठी आर्थिकदृष्ट्या अत्यंत कठीण होता. घरची परिस्थिती बेताची असल्याने कुटुंबाला आधार देण्यासाठी बापू याला मुंबईतील एका खासगी कंपनीत तब्बल पाच वर्षे नोकरी करावी लागली. मात्र, नोकरी करत असतानाही प्रशासकीय सेवेत जाऊन समाजाची सेवा करण्याचे स्वप्न त्याच्या मनात जीवंत होते. अखेर २०१७ मध्ये त्याने पूर्ण ताकदीनिशी यूपीएससीचा अभ्यास करण्याचा निर्णय घेतला आणि दिल्ली गाठली. दिल्लीत राहून आपल्या मित्रांच्या मदतीने त्याने दररोज ८ ते १० तास अभ्यासाचा सराव केला. छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार प्रेरणास्थान मानून त्याने अभ्यासाचे सातत्य राखले, ज्याचा परिणाम आज निकालाच्या रूपाने सर्वांसमोर आहे.

### संघर्षातून यशाचे शिखर आणि कुटुंबीयांचा भक्कम आधार

कोणत्याही मोठ्या यशामागे कौटुंबिक पाठबळ महत्त्वाचे असते, याची प्रचिती बापूसाहेबच्या उदाहरणावरून येते. या संपूर्ण प्रवासात त्याला त्याच्या मोठ्या भावाचे मोलाचे मार्गदर्शन लाभले, जे स्वतः केंद्रीय विद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय त्याचे आई-वडील, मेहुणे आणि दिल्लीतील मित्र परिवाराने त्याला मानसिक आणि आर्थिक बळ दिले. सुरुवातीच्या काळात अनेक अपयशांचा सामना करावा लागला तरी, ध्येय गाठल्याशिवाय थांबायचे नाही हा निश्चय त्याने केला होता. बापूसाहेबच्या मते, ‘जर तुमच्याकडे स्पष्ट ध्येय आणि ते पूर्ण करण्याची जिद्द असेल, तर परिस्थिती कधीही तुमच्या आड येत नाही.’ आज गायकवाड कुटुंबातील दोन मुले सरकारी सेवेत उच्च पदावर कार्यरत झाल्याने, त्यांच्या संघर्षाच्या काळोखात यशाचा प्रकाश पसरला आहे.

बापूच्या यशाची बातमी समजताच त्याच्या वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. जुन्या दिवसांच्या आठवणींना उजाळा देताना ते भावूक झाले होते. एकेकाळी खिशात एक रुपयाही नसताना आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा हा यक्षप्रश्न समोर असताना, आज आपल्या मुलाने मिळवलेले हे यश त्यांना स्वप्नवत वाटत आहे. ज्या समाजात आणि परिसरात बापूसाहेब वाढला, तिथे आज आनंदाचे वातावरण असून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सामान्य घरातील मुलगाही जिद्दीच्या जोरावर देशातील सर्वोच्च परीक्षेत यश मिळवू शकतो, हे बापूने सिद्ध केले आहे. आता प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करताना सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यास आपले प्राधान्य असेल, असा विश्वास त्याने व्यक्त केला आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे




# मारुतीरायांच्या गदेचे नाव काय? त्यांना कुणी दिली होती ती गदा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाशक्तीशाली मारुतीराया हे अनेकांचे दैवत आहेत. आखाड्यात, जीममध्ये जाणाऱ्यांचे, बलोपसकांचे ते आराध्य दैवत आहेत. त्यांच्याकडे नेहमी गदा असते. या गदेचे नाव आहे तरी काय? ही गदा त्यांना कुणी दिली?

महाशक्तीशाली हनुमानजी हे बलोपसकांचे आराध्य दैवत आहेत. इतकेच नाही अनेक जण भीती वाटायला लागली की अगोदर मारुतीरायांचा धावा करतात. त्यांच्याकडे अनंत शक्ती आहेत. धर्माच्या संरक्षणासाठी आणि दुष्टांचा नायनाट करण्यासाठी या शक्तींचा ते वापर करतात अशी मान्यता आहे. पांडवातील भीम याच्याकडे १० हजार हत्तीं इतकी शक्ती होती, असे म्हटले जाते. पण तोही हनुमानजींची शेपूट सुद्धा हलवू शकला नाही अशी कथा आपण वाचली असेल. तर या अनेकांच्या अराध्य दैवताकडे नेहमी एक गदा असते. या गदेचे नाव काय आहे आणि ती त्यांना कुणी दिले हे अनेकांना माहिती नाही. काय आहे त्याचे उत्तर?



### मारुतीरायांच्या गदेचे नाव काय?

मारुतीराया बलभीमा, अशी प्रार्थना या इष्ट दैवताची करण्यात येते. मारुतीरायांची महिमा अनेक ग्रंथात येते. त्यांच्यावर अनेक स्तुतीकाव्य आणि त्यांच्या प्रभू श्रीरामांच्या भक्तीचे संस्कार देशातील अनेक पिढ्यावर झाले आहेत. ते एकनिष्ठ आणि रामभक्त असल्याचे आपण वाचतो. त्यांच्याकडून शक्ती, भक्ती हे गुण घ्यावेत असे म्हटले जाते. तर हनुमानजींच्या गदेचे नाव 'कौमोदकी' असे आहे. ही गदा अत्यंत बलाढ्य आणि वजनदार असल्याचे मानले जाते. या गदेच्या प्रहाराने अनेक भयावह राक्षस आणि दानवांचा पराभव झाला आहे.

### हनुमानजींना ही गदा दिली कुणी?

तर मारुतीरायांना ही गदा दिली कुणी असा सवाल अनेकांना पडतो. धार्मिक ग्रंथ आणि संदर्भ ग्रंथानुसार, हनुमानजींना ही कौमोदकी गदा कुबेर महाराजांनी दिली. ही काही साधारण गदा नाही. या गदेत अनेक अलौकिक आणि अद्भूत शक्ती आहेत. जेव्हा हनुमानजी बाल्यावस्थेत होते. तेव्हा याच शक्तींनी त्यांनी अनेकांना अचंबित केले होते. देवी-देवतांनाही त्यांच्या अचाट,अफाट, सहासी व्यक्तिमत्वाचे कौतुक वाटत होते. तेव्हा कुबेर महाराजांनी त्यांना ही गदा भेट दिली होती. ही गदा देताना हनुमानजी हे सदैव अजेय असतील, असे कुबेर महाराजांनी म्हटले होते.

### वामहस्तगदायुक्तम नावाचा अर्थ काय?

महाराष्ट्रात मारुतीरायांची प्रत्येक गावी मंदिरे आहेत. स्वामी रामदासांनी त्यातील अनेक मंदिरांचे काम केल्याचे म्हटले जाते. अनेक गावांत आपण पंचमुखी हनुमानजींची मूर्ती अथवा प्रतिमा पाहिली असेल. या पंचमुखी प्रतिमेत त्यांच्याकडे खड़ग, खट्वआंग, पर्वत, अंकुश, त्रिशूल, पाश, मुष्टि, स्तंभ, गदा आणि वृक्ष दिसून येतो. काही ठिकाणी हनुमानजींचे वर्णन 'वामहस्तगदायुक्तम' असे करण्यात आले आहे. हनुमानजी डाव्या हातात गदा धरून आहेत. त्यामुळे त्यांना 'वामहस्तगदायुक्तम' असे म्हटले जाते.



## नृसिंहवाडीच्या वारीचे मर्म! 'नुसार' आणि 'ऐपतीनुसार'...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नरसोबाची वाडी... दत्त भक्तांची माहेरवाण. पण तेथे जाण्यापासून ते तेथे वागण्यापर्यंत सगळे कसे असावे? अभय आचार्य यांनी मांडलेला हा 'नानांचा' संवाद आपल्याला खूप काही शिकवून जातो. पंगत आटोपली आणि गप्पांच्या ओघात नानांनी एक खूप मोठी गोष्ट सांगितली.

### १) वारी कधी करावी? (प्रारब्धानुसार)

आपल्याला वाटते, की आपल्याकडे सुट्टी आहे, पैसे आहेत म्हणून आपण 'वाडीला' जाऊ शकतो. पण नाना म्हणतात, की 'नाही रे बाबा. हे सर्वस्व दत्त महाराजांच्या मनात असलेल्या आपल्या श्रद्धेच्या आणि प्रारब्धाच्या ऐपतीनुसार ठरते.' जेव्हा त्यांचा साद येतो, तेव्हाच पावले तिकडे वळतात. तिथी महत्त्वाची नाही, तुमची ओढ महत्त्वाची.

### २) काय अर्पण करावे? (भावाच्या ऐपतीनुसार)

परमात्मा तुमच्या अर्पणाच्या किमतीवर कधीच खूश होत नाही. तुम्ही रिकाम्या हाताने गेलात तरी त्याला चालते आणि खूप काही नेले तरी तो पक्षपात करत नाही. तेथे तुमची 'भावाची ऐपत' मोजली जाते. तुमच्या मनात किती श्रद्धा आहे, हेच त्याच्यासाठी खरे नैवेद्य असते.

### ३) सेवा आणि विधी (शारीरिक आणि आर्थिक ऐपतीनुसार)

विधी : तुम्ही तेथे काय विधी करावेत, हे तुमच्या खिशाच्या आणि मनाच्या आर्थिक व श्रद्धात्मक ऐपतीनुसार असते.

सेवा : चार वेळा कृष्णा घाटाच्या पायऱ्या चढणे-उतरणे किंवा प्रदक्षिणा घालणे यात आपल्या शारीरिक कुवतीची (ऐपतीची) लगेच जाणीव होते. तेथील सात्विक अन्न तुम्हाला ती सेवा करण्याचे बळ आणि हुरूप देते.

### ४) बासुंदी आणि पचन (कोठ्याच्या ऐपतीनुसार)

वाडीची बासुंदी तर जगप्रसिद्ध. पण ती किती प्यावी? हे सुद्धा तुमच्या कोठ्याच्या (पचनाच्या) ऐपतीनुसार. आपण कितीही शूरपणाचे बाणे दाखवले, तरी निसर्गाच्या आणि शरीराच्या नियमांपुढे आपण फक्त एक सामान्य भक्त असतो. नृसिंहवाडीत गेल्यावर माणसाचा 'मी'पणा गळून पडतो. तेथे फक्त 'नुसार' हा शब्द उरतो. सर्व काही त्या दत्तप्रभूंच्या इच्छेनुसार आणि आपल्या प्रारब्धानुसार घडत असते.

। श्री गुरुदेव दत्त।

## देवासमोर दिवा लावताना काय कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कोणत्याही पूजेची सुरूवात करण्यापूर्वीच सुरूवातीला एका बाजूला दिवा लावला जातो. पूजा करण्याचा घेतलेला संकल्प पूर्ण होईपर्यंत तेवत राहण्याचे, स्थिर राहण्याचे आवाहन अग्नी देवतेला केले जाते. यानंतर पूजा झाल्यानंतरही देवासमोर दिवा लावला जातो. आरती करताना निरांजनात फुलवात किंवा वात लावून ते देवाच्या तोंडापासून पायापर्यंत ओवाळावे. वात पांढऱ्या स्वच्छ कापसाची असावी. ती तेलात भिजवू नये. शक्यतोपर्यंत तुपात भिजवावी. निरांजनासारख्या पात्रात दीप लावून तो ओवाळून झाल्यावर समईसारख्या उंच पात्रात ठेवण्याची व्यवस्था असावी. देवाच्या तोंडावर उजेड पडेल अशा ठिकाणी दीप ठेवावा. देवावर अंधार पडेल अशा ठिकाणी दीप ठेवू नये. दीप लावताना दीपाने दीप लावू नये. काडीने दीप लावावा. दिव्याने दीप लावल्याने आणि विझल्यावर अर्धवट जळकट वातीची घाण सुटल्याने रोग व दारिद्र्य प्राप्त होते. जमिनीवर वात केव्हाही लावू नये. निरांजनातून वात काढून ठेवू नये. अनेक वाती लावणे असल्यास विषम प्रमाणात म्हणजे १-३-५-७ अशा लावाव्यात. दीप लावताना त्यात वातीशिवाय थोडे तेल घालावे. तुळशीपाशी दिवा लावण्यापूर्वी अक्षतांचे आसन अर्थात दिव्याखाली अक्षता ठेवाव्यात.



त्यावर आपल्या इच्छेनुसार तेल किंवा तुपाचा दिवा लावावा.

देवी लक्ष्मी अक्षतांचे आसन ग्रहण करते, असे मानले जात असल्याने अक्षता ठेवल्याने देवी विराजमान होते. निरांजनात तूप व तेल कधीही एकत्र घालू नये. कारण तूप हे सत्त्व तत्त्व व निर्गुण आहे व तेल हे रज तत्त्व व सगुण आहे. म्हणून हे दोन्ही एकत्र करता येत नाही. नाहीतर तम तत्त्व वाढेल. आरती म्हणताना देवाला ओवाळताना तबक देवाभोवती घड्याळाच्या काट्यांच्या दिशेने पूर्ण वर्तुळाकृती फिरवावे. आरती ओवाळताना ती देवाच्या डोक्यावरून ओवाळू नये. आरती झाल्यानंतर 'घालीन लोटांगण' ही प्रार्थना म्हणावी. यानंतर 'कर्पूरगौरं करुणावतारं' हा मंत्र म्हणत कापूर-आरती करावी. कापूर-आरती ग्रहण करावी, म्हणजे ज्योतीवर दोन्ही हातांचे तळवे धरून मग उजवा हात डोक्यावरून पुढून पाठी मानेपर्यंत फिरवावा.

काही कारणास्तव कापूर-आरती केली नसल्यास तुपाच्या निरांजनाच्या ज्योतीवर हात धरून आरती ग्रहण करावी. देवाला शरणागत भावाने नमस्कार करावा. देवासमोर दिवा लावल्याने लक्ष्मी प्रसन्न होते आणि तेथे स्थिर होते, अशी मान्यता आहे. शुद्ध तुपाचा दिवा लावणे अत्यंत फायदेशीर मानले गेले आहे. शुद्ध तुपात वातावरणातील जंतू दूर करण्याची क्षमता असते. अशा तुपाचा जेव्हा अग्नीशी संबंध येतो त्यावेळी वातावरण एकदम पवित्र होते. प्रदूषण दूर होते. दिवा लावल्याने संपूर्ण घराला त्याचा फायदा होतो. दिवा लावताना दिव्याची वात कोणत्या दिशेला असावी, याचेही काही नियम सांगण्यात आले आहेत. तेलाचा दिवा आपल्या उजव्या हाताला ठेवावा आणि तुपाचा दिवा आपल्या डाव्या हाताला असायला हवा. धनलाभासाठी दिव्याची वात उत्तर दिशेला ठेवावी. आपल्या घरामध्ये वारंवार कोणी आजारी पडत असल्यास दिव्याची वात पूर्व दिशेला ठेवावी. या दोन्ही दिशा अत्यंत शुभ मानण्यात आल्या आहेत. पश्चिम दिशेला दिव्याची वात असल्यास आपल्याला अनेक अडचणींचा सामना करावा लागू शकतो. दक्षिण यमाची दिशा असल्याने दक्षिण दिशेला कधीही दिव्याची वात नसावी, देवासमोर लावलेला दिवा विझला किंवा दिवा लावताना विझला, तर तो अशुभ संकेत मानला जातो. मात्र, धर्मशास्त्रात याला कोणताही आधार नाही. त्यामुळे दिवा विझल्यास घाबरून जाता कामा नये. देवाची आणि दिव्याची क्षमायाचना करून तो पुन्हा प्रज्वलित करावा. मात्र, दिवा ओवाळताना तो चुकून खाली पडला, तर त्यासाठी दीपपतन नावाची शांती करावी लागते. ज्या ठिकाणी दिवा पडला, त्याच ठिकाणी ती शांत करावी, असे सांगितले जाते.

## शहाणपण कुठूनही येऊ शकते

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तुकाराम महाराज फार साध्या शब्दांत मोठी अडचण उघडी करतात-स्त्री पुत्र बंदीजन ।
नारायण स्मरविती ॥
याचा अर्थ स्पष्ट आहे, की पत्नी, मुलगा किंवा अगदी घरातील नोकर-कोणीही जर तुम्हाला चांगला मार्ग दाखवत असेल, भक्तीचा किंवा नीतीचा मार्ग सुचवत असेल, तर 'तो कोण आहे' हे न पाहता तो मार्ग आचरणात आणावा. येथे तुकोबा भक्तीचा अर्थ केवळ देवस्मरणापुरता घेत नाहीत, सरळ, सज्जीवनाचा मार्ग असा 'ए' घेतात. पण प्रत्यक्षात आपण काय करतो? घरातली बायको काही योग्य सांगते थोडे शांतपणे बोल. मुलगा महणतो बाचा, हे चुकीचे आहे. घरातला कर्मचारी सुचवतो हे असे केले तर बरे होईल. आणि आपण लगेच म्हणतो मला शिकवतोस? येथेच तुकोबा थांबवतात, याच विचाराचे फार सुंदर, कमी बोलले जाणार. उदाहरण म्हणजे अब्राहम लिंकन लहानपणी फार हालअपेष्टा पाहिल्या. त्याची खरी आई लहानपणीच गेली. वडील कडक स्वभावाचे होते. पण त्याच्या आयुष्यात एक महत्त्वाची व्यक्ती आली त्याची सावत्र आई साराह बुश लिन्कोल्न. ती फार शिकलेली नव्हती. मोठ्या पदावर नव्हती. पण तिला एक गोष्ट कळत होती हा मुलगा संवेदनशील आहे, विचार करणारा आहे. ती त्याला सतत वाचनासाठी प्रवृत्त करायची. तू शिक, असे ती महणायची. तुझ्यात काहीतरी वेगळे आहे. लिंकन नंतर लिहितो 'जे काही चांगले माझ्यात आहे, त्याचे श्रेय माझ्या या आईला आहे.' ती त्याला राजकारण शिकवत नव्हती, धोरणे सांगत नव्हती. ती फक्त त्याला योग्य दिशा देत होती प्रामाणिकपणा, सहानुभूती, विचारपूर्वक वागणे, आणि लिंकनने ते स्वीकारले. कारण त्याने कोण सांगतोय याऐवजी काय सांगतोय हे पाहिले. नंतर राष्ट्राध्यक्ष झाल्यावरही लिंकनचा हा गुण कायम राहिला. साध्या सैनिकाचे म्हणणे ऐकणे, सामान्य लोकांच्या दुःखाकडे लक्ष देणे हे त्याचे वैशिष्ट्य ठरले. हीच तर तुकोबांची शिकवण आहे. आपल्या आयुष्याताही हे रोज घडते. कधी पत्नी आपल्याला वेळेवर थांबायला शिकवते. कधी मूल आपल्याला माणुसकीचा आरसा दाखवते. कधी घरातला साधा माणूस आपल्या अहंकाराला प्रश्न विचारतो. तुकाराम महाराज सांगतात शहाणपण वरून खाली येत नाही; ते अनेकदा घरातून, नात्यांतून, साध्या माणसांकडून येते. प्रश्न हा नाही की मला कोण शिकवतेय, खरा प्रश्न हा आहे मी शिकायला तयार आहे का? कारण जो माणूस पत्नी, मुलगा किंवा साध्या सेवकाकडूनही योग्य मार्ग स्वीकारतो, तोच खऱ्या अवनी नारायण स्मरणात जगतो. देव मंदिरात शोधत नाही, तो जगण्यात उतरवतो.

## 'छाया सोमेश्वर' : विज्ञानाला कोडे घालणाऱ्या एका अद्भुत रहस्याची गाथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्राचीन भारताच्या दक्षिण भागात जेथे कृष्णा आणि मुसी या नद्यांच्या कुशीत निसर्ग आणि संस्कृतीचा संगम झाला आहे. तेथे तेलंगणातील नलगोंडा जिल्ह्यात पनुगल्लु नावाचे एक ऐतिहासिक गाव वसलेले आहे. या गावाच्या मातीत अनेक शतकांचा वैभवशाली इतिहास दडलेला आहे. पण येथील एका मंदिराचे रहस्य मात्र आजही जगाला थक्क करते. हे मंदिर म्हणजे 'छाया सोमेश्वर'. या मंदिराचा इतिहास साधारण ११ व्या शतकातील आहे. जेव्हा कुंदुरू चोड वंशाचे राजे या भागावर राज्य करीत होते. त्या काळातील राजे केवळ साम्राज्य विस्ताराचा विचार करत नसत, तर ते कला, स्थापत्य आणि विज्ञानाचे मोठे भोक्ते होते.

असे म्हटले जाते, की जेव्हा या मंदिराचे बांधकाम सुरू झाले तेव्हा मुख्य वास्तुविशारदाने राजाला एक अनोखे वचन दिले होते. त्याने सांगितले होते, की तो एक असे मंदिर उभारेल जेथे प्रत्यक्ष महादेव आपल्या सावलीच्या रूपात सदैव उपस्थित राहतील. हे ऐकून राजालाही आश्चर्य वाटले. कारण विज्ञानानुसार सावली तर प्रकाशाच्या कोनाप्रमाणे आपली जागा बदलत असते. मग ती एका जागी स्थिर कशी राहू शकते? पण त्या महान कारागिराने आपल्या अगाध बुद्धिमत्तेच्या जोरावर हे शक्य करून दाखविले आणि इतिहासातील एक अजरामर आश्चर्य निर्माण केले.

या मंदिराची आध्यात्मिक बाजू तितकीच प्रगल्भ आहे. पौराणिक कथांनुसार हे तेच पवित्र स्थान आहे जेथे भगवान शिवाने सोमेश्वर रूपात दर्शन दिले होते. 'सोम' म्हणजे चंद्र आणि 'ईश्वर' म्हणजे महादेव. चंद्राने आपल्या शापातून मुक्त होण्यासाठी ज्या ठिकाणी कठोर तपश्चर्या केली, त्या निवडक ठिकाणांपैकी हे एक मानले जाते. म्हणूनच या मंदिराला 'सोमेश्वर' असे नाव पडले. पण या नावाच्या मागे 'छाया'







हा शब्द लागण्यामागे एक अद्भुत गुपित आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश करताच समोर असलेल्या शिवलिंगावर एक गडद, उभ्या खांबासारखी सावली पडलेली दिसते. ही सावली म्हणजे केवळ अंधार नाही, तर ते एक असे गूढ आहे जे सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत आपली जागा तीळमात्रही बदलत नाही. बाहेर सूर्य कुठेही असला, तरी गाभाऱ्यातील ती सावली अढळ असते. स्थानिक भक्तांच्या श्रद्धेनुसार ही सावली म्हणजे भगवान शिवाच्या जटेतून वाहणारी गंगा आहे, जी अखंडपणे शिवलिंगावर अभिषेक करत असते. काही लोक याला शिवाच्या शक्तीचे प्रतीक मानतात, जे आपल्या भक्तांच्या रक्षणासाठी तिथे सदैव उभे आहे.

या मंदिराच्या वास्तुकलेचा विचार केला तर त्या काळातील प्रगत विज्ञानाचे दर्शन घडते. हे मंदिर 'त्रिकुटा' शैलीत बांधलेले आहे. ज्याचा अर्थ येथे तीन गाभारे आहेत. मधल्या गाभाऱ्यात सोमेश्वर (शिव), एका बाजूला भगवान विष्णू आणि दुसऱ्या बाजूला सूर्यदेव विराजमान आहेत. हे त्रिदेवांचे अस्तित्व सृष्टीच्या निर्मिती, स्थिती आणि लयाचे प्रतीक मानले जाते. मंदिराचे सर्वांत मोठे आश्चर्य म्हणजे गाभाऱ्यात ज्या खांबाची सावली पडते असा कोणताही खांब शिवलिंगाच्या समोर नाही. हे पाहून आजही पर्यटक आणि वैज्ञानिक थक्क होतात. याचे खरे उत्तर त्या काळातील 'प्रकाश विज्ञानात' दडलेले आहे. मंदिरासमोरील खांबांची रचना अशा प्रकारे केली आहे, की बाहेरून येणारा प्रकाश त्या खांबांवरून परावर्तित होऊन गाभाऱ्यात पोहोचतो आणि तेथे एक 'ऑप्टिकल इल्युजन' तयार करतो. हे त्या काळातील अभियंत्यांचे अद्वितीय कौशल्य होते, ज्यांनी निसर्गाच्या नियमांना अशा प्रकारे गुंफले की ते एका चमत्कारासारखे भासावे.

काळाच्या ओघात या मंदिराने अनेक परकीय आक्रमणे आणि स्थित्यंतरे पाहिली. काही भाग उद्ध्वस्त झाला, पण त्या शिवलिंगावर पडणारी ती सावली मात्र कधीच पुसली गेली नाही. आजही महाशिवरात्रीला पनुगल्लु गाव भक्तीच्या रंगात न्हाऊन निघते. हजारो भाविक या अद्भुत 'सावलीचे' दर्शन घेण्यासाठी गर्दी करतात. त्यांच्यासाठी ही केवळ वैज्ञानिक घटना नाही, तर तो अढळ श्रद्धेचा विषय आहे. त्या शांत, अंधाऱ्या गाभाऱ्यात जेव्हा डोळे मिटून आपण उभे राहतो, तेव्हा विज्ञानाची सीमा जेथे संपते तेथे श्रद्धेचा प्रवास सुरू झाल्याचा अनुभव येतो. छाया सोमेश्वर मंदिर हे केवळ दगडांचे बांधकाम नसून ते मानवी बुद्धिमत्तेचे आणि ईश्वरी अस्तित्वाचे एक जीवंत स्मारक आहे. या मंदिराचे खांब आजही आपल्या गौरवशाली इतिहासाची साक्ष देतात आणि ही सावली म्हणजे भूतकाळ व भविष्यकाळाला जोडणारा एक पवित्र दुवा ठरली आहे.

कोटी पारायण-ललिता सहस्रनाम जप यज्ञात सहभागी व्हा
श्री चित्कला विमर्शन पीठम् वाशिमतर्फे सव्वा कोटी ललिता सहस्रनाम पारायण महायज्ञ आरंभ झाला आहे. आपणही या दिव्य उपक्रमाचा भाग व्हा.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)